Order
Issue notice to defendants and call there say.

I/C 6th CJSD, Kop

स्पे.कज्जा नं. २१३/२०२६

Exh 9/D

# मे. सि. ज. सि. डी. कोल्हापूर

यांचे कोर्टात...

**विनायक कृष्णा राउत**
व.व. ५०, धंदा : शेती व व्यापार
रा. कासारवाडा, ता. राधानगरी **तर्फे व.मु.**
**अनिल कृष्णा राउत**
व.व. ४७, धंदा :शेती
रा. कासारवाडा, ता. राधानगरी
जि. कोल्हापूर

**वादी**

IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI

Digitally signed by IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Date: 2026.05.12 17:23:53 +0530

**विरूध्द**

**१) अक्षय सुनिल चौगले**
व.व. ३०, धंदा : काही नाही
रा. मालवे, सरवडे, ता. राधानगरी
जि. कोल्हापूर
**२) निलग्रीव देवीदास बरडे**
व.व. ३२ , धंदा: काही नाही
रा. २५/१०९, सुनिता बिल्डींग रोड,
किनीकर हाउस, गिरोलकर चौक, समर्थवाडी,
येवतमाळ ४४५००१
मो.बा.नं. ७०५७९७५५५७
**३) गौरव धर्मा रंगारी**
व.व. ४०, धंदा: सुखवस्तु
रा. वाकी, तळेगाव यवतमाळ
**४) सुरज रघुनाथ देसाई**
व.व.२८, धंदा: काही नाही
रा. मोरयानगर, नाधवडे, कुर

**प्र.वादी**

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

ता. भुदरगड, जि.कोल्हापूर

**५) केशव गोविंद पाटील**

व.व. ४४, धंदा: काही नाही

रा. मालवे ता. राधानगरी

जि. कोल्हापूर

**६) पंकज अशोक कुलकर्णी**

व.व.२९, धंदा: काही नाही

रा. मु.पो. नाधवडे,कुर ता. भुदरगड

जि. कोल्हापूर

**७) भुषण बापुसो राजिगरे**

व.व.३५, धंदा: व्यापार — **प्र.वादी**

रा. कुर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

**८) स्वानंद शरद कुलकर्णी**

व.व. ४०, धंदा: व्यापार

रा. कुर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

**९) दिगंबर चंद्रकांत कालेकर**

व.व. ३५, धंदा – शेती

रा. गारगोटी ता. भुदरगड

जि. कोल्हापूर

**१०) भैय्यासाहेब उर्फ तानाजी विठ्ठल मोरे**

व.व. ५१, धंदा: व्यापार

रा. सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर.

**११) संदिप उत्तम टिक्का**

व.व. २७, धंदा– शेती

रा. सांबरे ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर

**सि.प्रो.को कलम १५१ सह ऑ. ३९**

**(१) (२) प्रमाणे अर्ज**

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

<u>वादीचे कळविणे की,</u>

**१) दावा मिळकतीचे वर्णन:—**

**अ)** मौजे भडगाव ता. कागल, जि. कोल्हापूर येथील गट नं. १७२ याचे एकुण क्षेत्र हे.३.१५ आर पैकी क्षेत्र ०हे. ४० आर यासी

चतु:सिमा:— पुर्वेस:— गट नं. १७३ ची जमिन

पश्चिमेस:— सदरी गट नंबर मधील जमिन मिळकत,

दक्षिणेस :— सदरी गटातील जमिन,

उत्तरेस :— निढोरी कागल रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमिन

**ब)** वर कलम १अ मध्ये नमुद ४० आर क्षेत्रात वादीने आपले प्रस्तावित पेट्रोल पंपासाठी केलेले बांधकाम पेट्रोल साठा करणारी टाकी, पेट्रोल, डीझेल मोजणी यंत्रे, लाईट फिटींग, ऑफिससाठी बांधकाम, पंपसेट तसेच दुकानगाळे अशा सर्व सोयीनेयुक्त अशी जागा बंदीस्त जागा व त्यातील बांधकाम

२) वर कलम १ अ मध्ये नमुद मिळकत ही वादीचे मालकीचे असून सदरची मिळकत वादीने सन २०१९ साली विकत घेतली आहे. वादीने सदरी १अ मध्ये नमुद मिळकत विकत घेतली त्यावेळी सदरची जमिन ही शेतपिकाऊ व काही पड अशी जमिन मिळकत होती.

३) दावा अर्जी कलम १ अ मध्ये नमुद मिळकतीबाबत यातील प्र.वादी नं. १, २ यांनी प्रथम दुय्यम निंबधक यांचे कार्यालयात वादीचा हमशकल उभा करून खोटे बिनभरणेचे वटमुखत्यारपत्र नोंदविले व सदरी वटमुखत्यारपत्राआधारे प्र.वादी नं. २ यांचे लाभात दुय्यम निंबधक पन्हाळा यांचे कार्यालयात बिनभरणेचे पोकळ व खोटे दावा मिळकत १अ बाबत खरेदीपत्र नोंदविले आहे. खरेदीपत्राचा दस्त तसेच वटमुखत्यारपत्राचा दस्त हे दोनही दस्त बिनभरणेचे चुकीचे व बेकायदेशीर असे आहे वादीने त्याबाबत हक्कज्ञापनाचा व दस्त

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

रद्दबातल ठरवून मिळणेबाबत प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दावेचे कामी वादीने तुर्तातुर्त मनाई मागितली आहे.

४) प्र.वादी नं. १ ने दावा मिळकत १अ तसेच कळंबा ता. करवीर येथील वादीचे मालकीचे गट नं. ३३९ व ४४२ या जमिनीबाबत ही बेकायदेशीर बिनभरणेचे खरेदीपत्र नोंदविले आहे त्याबाबत वादीने अलाहिदा स्पे. कज्जा नं. १८६/२०२६ चा दावा दाखल केला असून सदरी दावेचे कामी ही वादीने प्र.वादी नं. १ प्र.वादी नं. ३ ते १० व इतर यांचेविरूध्द तुर्तातुर्त मनाई मागितली आहे सदरी दावेची नोटीस प्र.वादींना लागू झाली आहे. दोनही दावेतील प्र.वादी दिगंबर चंद्रकांत कालेकर व इतर यांनी खोटे दस्त नोंदविले आहेत.

५) वर नमुद दावा मिळकत १ अ तसेच कळंबा येथील गट नं. ३३९ व ४४२ या मिळकती शेतमिळकती आहेत, खुले मिळकती आहेत असे निदर्शनास आणून खोटे दस्त नोंदविले आहेत वास्तविक सदरी मिळकती या शेतमिळकती राहिले नसून सदरी मिळकतीत पेट्रोल पंप तसेच गोडाउन अशा मिळकती आहेत. असे असता दुय्यम निबंधक यांची फसवणूक करून खोटा इसम उभा करून दस्त नोंदविले आहेत. प्रस्तुत दावेचे कामी तसेच स्पे.कज्जा नं. १८६/२०२६ चे कामी दावा मिळकतीत अस्तित्वात असले गोडाउन, पेट्रोल पंप यांचे वहिवाटीस हरकत करू नये तसेच मिळकतीचे नुकसान करू नये, याबाबत वादीने मनाई मागितली आहे. दावेचे कामी प्र.वादीचे पितळ उघडे पडले आहे. दावा मिळकत ही शेतजमिन नसलेचे निदर्शनास आणले आहे. सदरची गोष्ट मे. कोर्टाचे निदर्शनास येणार म्हणून यातील प्र.वादींनी दि. ८/०५/२०२६ पासून मे. कोर्टास उन्हाळी सुट्टी लागते याचा गैरफायदा घेवून दावा मिळकत १ब मधील जे.सी.बी. ने पुर्ण खोदून पेट्रोल चे टाकी चोरून नेले आहेत तसेच पेट्रोल, डिजेलची सर्व यंत्रणा याची विल्हेवाट लावून दावा मिळकतीत वादीने नमुद केलेले वस्तु नष्ट करणेचा प्रयत्न चालविला आहे पैकी प्र.वादीनी पेट्रोल चे टाक्या या अलाहिदा पळवून नेवून लंपास केले आहेत.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

६) प्रस्तुत कामी वादीने तुर्तातुर्त मनाई अर्जाव्दारे मनाई मागितली आहे. सदरी अर्जावर मे. कोर्टाने कारणे दाखवा नोटीसचा आदेश केला आहे व याची पुर्ण कल्पना प्र.वादींना आलेली आहे. कारणे दाखवा नोटीसचा आदेश केला आहे याचा गैरफायदा घेवून प्र.वादी हे दावा मिळकतीचे स्वरूपात बदल करू पाहत आहेत तसे झालेस प्रस्तुत दावेचे कामी वादीचे अतोनात नुकसान होणार आहे.

७) प्रस्तुत कामी दावेचे तसेच तुर्तातुर्त मनाई अर्जाचे नोटीस लागू होणेची आहेत दरम्यान दावेची कल्पना आलेने प्र.वादी असे गैरकृत्य करीत आहेत.

सबब, प्रस्तुत दावेतील नि. ५ चा अर्ज गुणदोषावर निर्णयीत होई पावेतो दावा मिळकतीतील आहे ती परिस्थिती कायम ठेवणेबाबत आदेश होणे गरजेचे आहे.

सबब विनंती की, दावा मिळकत १ब चे स्वरूपात प्र.वादीनी कोणताही बदल करू नये दावा मिळकतीचे नुकसान करू नये, दावा मिळकतीबाबत आहे ती परिस्थिती कायम ठेवणेबाबत आदेश व्हावा.

कोल्हापूर

दिनांक : १२/०५/२०२६

**ॲफिडेव्हीट**

देवाशपथ खरे कथन करते की, माझे नाव **अनिल कृष्णा राऊत** व.व. ४७, व्यवसाय– शेती ,रा. कासारवाडा ता. राधानगरी,जि.कोल्हापूर मी वादीचा वटमुखत्यार असुन वादीने दिले माहिती व मला प्रत्यक्ष माहित असले वस्तुस्थितीनुसार वर अर्जातील सर्व मजकूर माझे महिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट .

कोल्हापूर

दि. १२/०५/२०२६

I know the deponent

(Adv V.B. Mohyam)

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

## प्रतिज्ञा

मी यातील वादी सत्य प्रतिज्ञेवर खरे कथन करतो की, वरील अर्जातील मधील नमूद केलेला सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा

कोल्हापूर

दि. १२/०५/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Anil Krushna Raut, Age 47 yrs.,
of Kasarwada who is Tal. Radhanagari
identified by Shri N.B. Mahajan Adv.
...........whom I know personally
Dated :- 12.05.2026.

Assistant Superintendent